आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

बुधवार दिनांक 21/01/२०२६

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 43 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# ‘बजाज पुणे ग्रँड टूर-2026’

## पिंपरी-चिंचवडकरांनी केले जल्लोषात स्वागत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : ढोल-ताशांचा निनाद, टाळ्यांचा गजर आणि उत्साहाची लाट अशा जल्लोषपूर्ण वातावरणात पिंपरी चिंचवडकरांनी ‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे जल्लोषात स्वागत केले. वेग, शिस्त आणि खेळभावनेचा संगम असलेली ही स्पर्धा नागरिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सायकलपटूंचे पिंपरी चिंचवड शहरात आगमन होताच लक्ष्मी चौक ते आकुर्डी या मार्गावर ही स्पर्धा पाहण्यासाठी नागरिकांची हजारोंच्या संख्येने दुतर्फा गर्दी जमली होती. पिंपरी चिंचवड महापालिकेने या स्पर्धेच्या अनुषंगाने जय्यत तयारी करीत शहरातील प्रमुख मार्गांसह तसेच चौकांमध्ये ठिकठिकाणी फुलांची आकर्षक सजावट केली होती.**



‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याला आज प्रचंड उत्साहात सुरुवात झाली. टी.सी.एस. सर्कल, हिंजवडी येथून सुरू झालेल्या या टप्प्याचा समारोप डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट, आकुर्डी, रावेत येथे झाला. याठिकाणी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यातील विजेत्यांचा सन्मान खासदार मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डुडी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, राजाराम सरगर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार यांच्यासह महापालिका तसेच विविध उद्योग समूहांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक यावेळी उपस्थित होते.‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यातील एकूण अंतर ९१.८ किलोमीटर होते. या टप्प्याची सुरुवात टी.सी.एस.सर्कल, हिंजवडी येथून झाली. स्पर्धा सुरू असतानाच रस्त्यांवर सायकलपटू वेग आणि क्षमतेचा सुरेख मिलाफ सादर करताना दिसले. काही ठिकाणी तीव्र वळणे, चढ-उतार असल्याने स्पर्धकांसमोर आव्हाने होती. मात्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू आत्मविश्वासाने ही आव्हाने पेलताना दिसून आले. मार्गावरील ठरावीक ठिकाणी वैद्यकीय मदत, रुग्णवाहिका, तांत्रिक मदत वाहने तसेच रिफ्रेशमेंट पॉइंट्स सज्ज ठेवण्यात आले होते. ड्रोन, सीसीटीव्ही कॅमेरे आणि मोटरसायकल पथकांच्या माध्यमातून सातत्याने स्पर्धा परिसराचे निरीक्षण करण्यात येत होते.पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील लक्ष्मी चौक येथे या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सायकलपटूंचे आगमन होताच त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. हे सायकलपटू लक्ष्मी चौक–भूमकर चौक–डांगे चौक–श्री संत नामदेव महाराज चौक मार्गे आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट येथे पोहोचले. यावेळी लक्ष्मी चौक ते आकुर्डी या मार्गावर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी होती. स्पर्धेच्या समारोपस्थळी सायकलपटूंचे पिंपरी चिंचवडकरांनी जल्लोषात स्वागत केले आणि त्यांना प्रोत्साहन दिले. विशेष करून यावेळी तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### पिंपरी चिंचवड महापालिकेचे सूक्ष्म नियोजन

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने ‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यासाठी व्यापक तयारी करण्यात आली होती. स्पर्धा मार्गाची पाहणी करून वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा, आरोग्य सेवा तसेच आपत्कालीन सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करण्यात आले. काही कालावधीसाठी मार्गांवर वाहतूक वळविण्यात येऊन आवश्यक त्या ठिकाणी मार्ग बंद ठेवण्यात आले होते. याशिवाय स्पर्धा मार्गावर चौकाचौकांत उद्यान विभागाच्या वतीने फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

### भिंतींवर साकारला क्रीडा आणि संस्कृतीचा वारसा

पिंपरी चिंचवड शहरात ‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या ऐतिहासिक सायकलिंग स्पर्धेच्या निमित्ताने शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी आणि नागरिकांमध्ये खेळाप्रती उत्साह निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने ठिकठिकाणी आकर्षक भित्तिचित्रे साकारण्यात आली आहेत. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत शहराच्या सौंदर्यीकरणाचा हा प्रकल्प राबवण्यात आला आहे. या भित्तिचित्रांमध्ये केवळ सायकलिंगच नव्हे, तर विविध खेळांतील दिग्गज खेळाडूंचा गौरव करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरा आणि संस्कृतीचे दर्शनही या भिंतींवर घडत होते. या कलेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवडमध्ये क्रीडा उत्सवासाठी योग्य वातावरणनिर्मिती झाली आहे.

### हे आहेत स्पर्धेतील विजेते

प्रथम - मॉडगवे लोके (Modgway Loke)

द्वितीय - सँटी आर्ने (Santy Arne)

तृतीय - जॉर्जिओस (Georgios )

बेस्ट इंडियन रायडर - हशवीर सिंग (Hashveer Singh)

बेस्ट यंग रायडर - स्पिएरो तामार (Spiero TaMar)

बेस्ट एशियन रायडर - साइनबायर (Saainbayarr)

किंग ऑफ माऊंटन - रायलेआनू क्रिस्टियन (Raileanu Cristian)

### २३ जानेवारी २०२६ रोजी देखील पिंपरी चिंचवडकरांना अनुभवता येणार पुणे ग्रँड टूरचा थरार

बजाज पुणे ग्रँड टूरचा महत्त्वाचा टप्पा मंगळवार, २३ जानेवारी रोजी पिंपरी-चिंचवड शहरातून जाणार असून, या टप्प्याची सुरुवात दुपारी १.३० वाजता श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, म्हाळुंगे-बालेवाडी येथून होणार आहे. बालेवाडी स्टेडियममधून निघाल्यानंतर ही स्पर्धा पुण्यातील अनेक टप्पे पार करत राजीव गांधी पूल (औंध), काळेवाडी फाटा, बास्केट ब्रिज (रावेत), डी. वाय. पाटील कॉलेज (आकुर्डी), भक्ती-शक्ती चौक, त्रिवेणीनगर चौक, दुर्गानगर चौक, इंद्रायणी नगर चौक, संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर सर्कल, स्पाईन रोड, जुना आरटीओ रस्ता, आयुक्त बंगला व एम्पायर इस्टेट ब्रिज मार्गे पुन्हा काळेवाडी फाटा आणि राजीव गांधी पूल (औंध) येथून पुण्याकडे जाणार आहे. या टप्प्याचा समारोप दुपारी ४ वाजता जंगली महाराज रोड येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार असून, या दिवशी देखील पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातील नागरिकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकल स्पर्धेचा थरार अनुभवण्याची संधी मिळणार आहे.



# महिला उद्योजकता व युवक कौशल्य विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमांचे केले कौतुक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देवाश्री मुखर्जी यांनी पुणे दौऱ्यादरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती व महिला सक्षमीकरणाशी संबंधित विविध महत्वाकांक्षी प्रकल्पांना भेट दिली व माहिती घेतली.



या भेटीदरम्यान कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा, आयुक्त अमित सैनी, महाराष्ट्र राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, प्रादेशिक संचालक चेंगोटी मूर्ती यांच्यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,प्रशासन अधिकारी अनिता बाविस्कर तसेच स्वयंसेवी महिला बचत गटातील महिला आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभाग व लाईटहाऊस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या निगडी येथील 'कौशल्यम' (लाईटहाऊस) प्रकल्पास अधिकाऱ्यांनी भेट दिली. या केंद्रामध्ये तरुण व महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती घेण्यात आली. यावेळी प्रशिक्षणार्थी युवक व महिलांशी संवाद साधत त्यांनी प्रकल्पाच्या माध्यमातून मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी, कौशल्यविकासाची दिशा व आत्मविश्वास वृद्धीबाबत अनुभव जाणून घेतले.प्रशिक्षणार्थींनी या प्रकल्पामुळे उद्योगांच्या गरजांनुसार कौशल्य प्रशिक्षण मिळाल्याने नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याचे सांगितले. विशेषतः विवाहानंतर करिअरमध्ये आलेल्या अडचणींवर मात करून पुन्हा व्यावसायिक जीवनात प्रवेश करण्यासाठी या प्रकल्पाने मोठी प्रेरणा दिल्याचे महिलांनी नमूद केले. यावेळी अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणार्थींच्या प्रगतीचे कौतुक करत कौशल्याधारित रोजगार निर्मितीच्या दृष्टीने हा प्रकल्प प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त केले.यानंतर शिष्टमंडळाने आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळील महिला बचत गटांमार्फत चालविण्यात येणाऱ्या 'सखी आंगण' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास भेट दिली. ४९ गाळ्यांच्या या संकुलामध्ये महिला बचत गटांकडून फूड व नॉन-फूड अशा दोन प्रवर्गांत विविध उत्पादनांची निर्मिती, प्रक्रिया, पॅकेजिंग व थेट विक्री केली जाते. या ठिकाणी नाश्ता व जेवणाचे खाद्यपदार्थ, पापड, लोणची, मसाले, तयार खाद्यपदार्थ, बेकरी उत्पादने, हस्तकला साहित्य, सजावटीच्या वस्तू, कापडी पिशव्या, अगरबत्ती तसेच सौंदर्यप्रसाधनांशी संबंधित वस्तूंची विक्री करण्यात येते.महापालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या सखी आंगण प्रकल्पामुळे महिला बचत गटांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळत असून मध्यस्थांची साखळी टळल्याने महिलांना अधिक आर्थिक लाभ होत आहे. केवळ विक्रीपुरते मर्यादित न राहता आर्थिक व्यवहार, विपणन, ग्राहक संवाद व व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण महिलांना या प्रकल्पातून मिळत असल्याने अनेक महिला रोजगार देणाऱ्या उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. त्यामुळे 'सखी आंगण' हा प्रकल्प महिला सक्षमीकरणाचे आदर्श मॉडेल ठरत असल्याचे मत यावेळी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

> "महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे 'कौशल्यम' आणि 'सखी आंगण' हे उपक्रम केवळ प्रशिक्षण किंवा विक्रीपुरते मर्यादित नसून, रोजगारनिर्मिती व महिला उद्योजकता घडविणारे प्रभावी मॉडेल ठरत आहेत. उद्योगांच्या गरजांनुसार कौशल्य विकास, थेट बाजारपेठेपर्यंत पोहोच आणि आर्थिक स्वावलंबन यांचा एकत्रित विचार करून हे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने अशा उपक्रमांचा विस्तार करून अधिकाधिक युवक व महिलांना सक्षम करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे."
>
> **श्रावण हर्डीकर**, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरीत ज्येष्ठाची एक कोटींची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : सीबीआय मधून बोलत असल्याचे सांगत ज्येष्ठ नागरिकाला अटकेची भीती दाखवत विविध बँक खात्यांत पैसे वर्ग करण्यास भाग पाडून तब्बल एक कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली. ही घटना ३० डिसेंबर २०२५ ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत चिंचवड येथे घडली.याप्रकरणी ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांना फोन केला. फोनवरील व्यक्तींनी ते सीबीआय मधून बोलत असल्याचे सांगितले.एका व्यक्तीवर झालेल्या कारवाई मध्ये फिर्यादी यांचे बँक खाते आढळले असून ते मनी लॉन्डरिंग साठी वापरले आहे. त्या खात्याची लिगॅलिटी चेक करायची असून एक कोटी रुपये घेत आरोपीच्या नावाखाली बँक व म्युच्युअल फंडातील रक्कम विविध खात्यांत पाठवण्यास भाग पाडले. चौकशी पूर्ण झाल्यावर रक्कम परत मिळेल, असे आश्वासन देण्यात आले; मात्र एक कोटी रुपये परत न करता फिर्यादीची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास सायबर पोलीस करत आहेत.



# मावळात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका 'मविआ' एकत्रित लढणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ तालुक्यात येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्रितपणे लढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, वंचित बहुजन आघाडी तसेच मनसे हे पक्ष एकत्र येऊन निवडणूक रणांगणात उतरणार असल्याची माहिती महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत दिली.**




या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे तालुकाध्यक्ष दत्तात्रय पडवळ, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष यशवंत मोहोळ, मनसेचे तालुकाध्यक्ष अशोक कुटे, उद्धवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भारत ठाकूर, युवा अध्यक्ष उमेश गावडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संतोष लोखंडे, तालुकाध्यक्ष नितीन ओव्हाळ, गणेश काजळे, राजीव फलके, सहादू आरडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी बोलताना आघाडीच्या नेत्यांनी सांगितले की, मावळ तालुक्यातील जिल्हा परिषदेचे पाच गट व पंचायत समितीचे दहा गण याठिकाणी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार उभे करण्यात येणार आहेत.

सर्व पक्षांमध्ये जागावाटपाबाबत सकारात्मक चर्चा सुरू असून लवकरच उमेदवारांची घोषणा करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.सध्या तालुक्यात सत्ताधारी पक्षाकडून विकासाच्या नावाखाली केवळ दिखावूपणा सुरू असून, सामान्य नागरिक, शेतकरी, महिला, युवक यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे.

या पार्श्वभूमीवर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी व लोकहिताच्या मुद्द्यांवर आधारित राजकारण करण्यासाठी महाविकास आघाडी एकत्र आली असल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले.

आघाडी सरकारच्या काळात राबवण्यात आलेल्या लोकाभिमुख योजना, सामाजिक न्याय, ग्रामीण विकास, रोजगारनिर्मिती आणि शेतकरी हिताच्या मुद्द्यांवर निवडणूक लढवली जाणार असून, जनतेचा विश्वास महाविकास आघाडीवर असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.

महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष समन्वयाने प्रचार करणार असून, प्रत्येक बुथवर मजबूत संघटन उभारून निवडणुकीत निर्णायक विजय मिळवण्याचा निर्धारही यावेळी नेत्यांनी व्यक्त केला.

# भंगाराच्या पैशांवरून वाद; पतीकडून पत्नीची दगड घालून हत्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भंगार विक्रीच्या पैशांच्या वाटणीवरून झालेल्या वादातून पतीने आपल्या पत्नीची काठीने मारहाण करून तसेच डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या केल्याची घटना शनिवारी (दि. १७) सकाळी म्हाळुंगे येथील कांझी हॉटेलजवळ उघडकीस आली.




या प्रकरणी दत्ता काळुराम जगताप (वय ३०, रा. बेबड ओहळ, मुळशी) याला बावधन पोलिसांनी अटक केली आहे. कुसुम वसंत पवार (वय ३२) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी एका महिलेने बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुसुम यांच्या पहिल्या पतीचे निधन झाले असून त्यांना तीन मुले आहेत. त्यानंतर त्या आणि त्यांच्या पतीचा भाऊ दत्ता जगताप हे पती-पत्नी म्हणून एकत्र राहत होते.

दोघेही भंगार गोळा करणे व मासेमारी अशी कामे करून उदरनिर्वाह करत होते.

भंगार विक्रीतून मिळालेल्या पैशांवरून दोघांमध्ये वाद झाला. या वादातून आरोपी दत्ताने कुसुम यांना शिवीगाळ करून काठीने डोके, मान व पोटावर बेदम मारहाण केली. कुसुम खाली कोसळल्यानंतर आरोपीने दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारून त्यांची हत्या केली.

भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादी महिलेलाही आरोपीने काठीने मारहाण केली असून त्यांच्या हाताची बोटे फ्रॅक्चर झाली आहेत. घटनेचा पुढील तपास बावधन पोलीस करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
आधुनिक शहरातील घडामोडी
बुधवार दिनांक 21/01/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# 25 जानेवारीला जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी:पिंपरी चिंचवड महापालिका व आशाकिरण सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव रविवार, २५ जानेवारी २०२६ रोजी मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.



महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त पंकज पाटील, ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये योगसाधना, शारीरिक स्वास्थ्य, मानसिक स्थैर्य तसेच शिस्तबद्ध जीवनशैलीचा संस्कार रुजवणे या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिका शाळेतील व खासगी शाळेतील इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत, तसेच विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

**अशी करता येणार नावनोंदणी....**

या जागतिक सूर्यनमस्कार महोत्सवासाठी नावनोंदणी २२ जानेवारी ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे दररोज सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत करता येणार आहे.

तसेच ९४२२२३१५६९ या व्हॉट्सअॅप मोबाईल क्रमांकावर देखील नावनोंदणी करता येईल. नावनोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मैदानावर केशवनगर येथील मोरया गोसावी क्रीडांगण येथे सकाळी ७.३० वाजता मुख्य सूर्यनमस्कार महोत्सवाला सुरुवात होणार आहे.

# पीसीसीओईआरचा 'एसएई इंडिया ई-बाहा 2026' राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

## पीसीसीओईआरला 11 पदके आणि 3 लाख 60 हजार रुपये बक्षीस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स या संस्थेने पीथमपुर येथील "एसएई इंडिया ई - बाहा २०२६" या राष्ट्रीय स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिचर्स च्या (पीसीसीओईआर) मेकॅनिकल विभागातील "टीम नॅशोर्न्स" ने दैदीप्यमान कामगिरी करीत एकूण ११ पदकांसह तीन लाख साठ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवून देशात प्रथम क्रमांक पटकावला.**



या स्पर्धेत देशभरातून शंभरपेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांनी भाग घेतला होता. पीसीसीओईआर च्या टीम नॅशोर्न्स ने टिकाऊपणा, उत्कृष्टतता, समग्र भौतिक गतिमान, निलंबन व संकर्षण अशा विविध विभागात प्रथम क्रमांक आणि स्टॅटिक, बौद्धिक, सीएइ या विभागांमध्ये तृतीय क्रमांक तसेच सर्वोत्कृष्ट पदार्पण पुरस्कार प्राप्त केला. पीसीसीओईआरच्या विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय स्पर्धेत पदार्पणातच राष्ट्रीय पातळीवरील प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या टीम मधील सर्व विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शक, प्राचार्य, समन्वयक यांनी एकत्रित पणे केलेले प्रयत्न आणि पीसीईटीच्या व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिलेल्या पायाभूत सुविधांमुळे हा सुवर्ण क्षण पहायला मिळाला आहे असे गौरवउद्गार पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी यावेळी काढले.

पीसीसीओईआर मधील विद्यार्थी कर्णधार सौरभ पाटील, उपकर्णधार महेंद्र कुंभार, चालक साजिद मुलानी, पृथ्वीराज पाटील, अखिलेश वांजपेय, देवेंद्र पाटील, ओंकार शेजवळ, धीरज पाटील, ऑस्टिन जॉर्ज, हेमंत पाटील, पार्थ पांदेकर, जय पगारे, रश्मीत गोयल, श्रीकृष्णा माने, विश्वजीत पाटील, प्रणव कांबळे, विश्वजीत कोल्हे, दिशांत पिपरे, श्रीरंग नायर, सोहम शेलार, आयुष पाटील, समरजीत तानपुरे, आदित्य माने, आणि ओम बडे या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता.प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, विभाग प्रमुख डॉ. गुलाब सिरसकर, प्रा. सुखदीप चौगुले, सुजित चौधरी यांनी मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईआर चे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968